विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

Reg. No. F670-WARDHA

बेटी बचाओ • बेटी पढाओ

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

बालाजी टाऊन, संत तुकडोजी वार्ड,
नंदोरी रोड, हिंगणघाट – ४४२ ३०१, जि. वर्धा
E-mail : makm.college@gmail.com
Web site : www.makwc.ac.in



# मातोश्री
# MATOSHRI

वार्षिकांक २०२३-२४

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

# आमचे प्रेरणास्थान



स्व. श्रीमती माँ विठाईलक्ष्मी तुळसकर

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

## मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

# आमचे मार्गदर्शक



## श्री. पांडुरंगजी तुळसकर

### अध्यक्ष

## आमचे नेतृत्व



**डॉ. उमेश तुळसकर**
प्राचार्य



**डॉ. नयना शिरभाते**
सदस्या

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा

(रजि. नं. : महा/२०४/८५/एफ-६७०, वर्धा)

### संचालक मंडळ



श्री. पांडुरंगजी तुळसकर
अध्यक्ष



डॉ. निलेश तुळसकर
उपाध्यक्ष



डॉ. उमेश तुळसकर
सचिव



श्री. विजयराव इटनकर
सहसचिव



सौ. रेखा तुळसकर
कोषाध्यक्ष



श्रीमती शांताबाई तळवेकर
सदस्या



डॉ. नयना शिरभाते
सदस्या

## मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

### महाविद्यालय विकास समिती - २०२३-२४

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ या कायद्यातील कलम ९७(१) च्या अंतर्गत महाविद्यालयीन समिती**



श्री. पांडुरंगजी तुळसकर
पदसिद्ध अध्यक्ष



श्री. विजयराव इटनकर
व्यवस्थापन सचिव, निर्देशित सदस्य



प्रा. सपना जयस्वाल
निर्देशित विभागप्रमुख सदस्य



प्रा. अभय दांडेकर
अध्यापक सदस्य



प्रा. वैशाली तडस
अध्यापक सदस्य



डॉ. नयना शिरभाते
शिक्षण सदस्या



प्रा. मोनिका मावुस्कर
अध्यापक सदस्य



श्री. अमीत रेंढे
अध्यापकेतर सदस्य



श्री. प्रभाकर आंबटकर
उद्योग सदस्य



डॉ. राजविलास करमोरे
संशोधन सदस्य



कु. देवयानी शिंगोटे
समाजसेवा माजी विद्यार्थी सदस्य



प्रा. अजय विरे
समन्वयक सदस्य



डॉ. उमेश तुळसकर
प्राचार्य व सदस्य सचिव

महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे सभापती व सचिव (विद्यार्थ्यांच्या निवडीनुसार सदस्य घेण्यात येईल)

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

# मातोश्री २०२४


**कार्यकारी संपादक**
प्रा. अजय बिरे

**सहसंपादक**
प्रा. डॉ. सपना जयस्वाल
प्रा. अभय दांडेकर
प्रा. भाग्यश्री साबळे
प्रा. मोनिका माऊसकर

**मराठी विभाग**
प्रा. अजय बिरे
प्रा. भाग्यश्री साबळे
प्रा. पुनम बुरीले

**इंग्रजी विभाग**
प्रा. अभय दांडेकर
प्रा. संगीता लांडगे

**हिंदी विभाग**
प्रा. मेघा जोशी

**साहित्य संकलन व संपादन**
प्रा. आचल वैद्य
प्रा. सुवर्णा कान्होलीकर

**विद्यार्थी संपादक**
कु. पल्लवी गौळकर B. A. III
कु. प्रिया प्र. उरकुडकर B. A. II
कु. जागृती डाखोरे B. Com. II
कु. स्नेहा शेंडे B. Com. III
कु. प्राची उघडे B. A. I
कु. धनश्री सोनवणे B. Sc. III
कु. वैष्णवी लोखंडे B. Sc. III
कु. स्नेहा खोंडे B. Sc. I

**छायाचित्र मांडणी**
प्रा. प्रणिता आष्टनकर
प्रा. प्रतिभा दुबे

**प्रकाशक**
डॉ. उमेश तुळसकर
प्राचार्य

**मुद्रक**
महेन्द्र ग्राफिक्स

(एकुण प्रती : १०००)



या वार्षिकांकामध्ये प्रकाशित झालेल्या साहित्यातील/लेखामधील मते ही त्या लेखकांची स्वत:ची मते असुन त्यांच्याशी प्रकाशक, मार्गदर्शक, वार्षिकांक समिती, संपादक मंडळ, संस्था किंवा मुद्रक सहमत असेलच असे नाही. .... प्रकाशक

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | लेखकाचे नांव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | मनोगत | प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर | २ |
| २. | संपादकिय | प्रा. अजय बिरे | ३ |
| ३. | स्वामी विवेकानंदांचे शैक्षणिक विचार | कु. श्रेया शेंडे | ४ |
| ४. | पेटेन पुन्हा नव्याने | कु. नेहा ग. खोंडे | ५ |
| ५. | आत्मविश्वास | कु. समृद्धि तांबेकर | ६ |
| ६. | आई | कु. देवयानी कोढापे | ६ |
| ७. | शिक्षक | कु. अनिका डुकरे | ७ |
| ८. | बाप | कु. आस्था रेवतकर | ७ |
| ९. | मैत्री | कु. रूपाली भगत | ८ |
| १०. | माझी आई | कु. माहेश्वरी खोंडे | ८ |
| ११. | मनातील दु:ख | कु. धनश्री सोनवणे | ८ |
| १२. | आई बाबाचे महत्व | कु. प्रिया उरकुडकर | ९ |
| १३. | माझं कॉलेज | कु. गौरी तेलहांडे | १० |
| १४. | विचित्र पण सत्य | कु. कशिश भिसेकर | १० |
| १५. | शाळा | कु. हर्षदा मोरे | ११ |
| १६. | नशिब | कु. केतकी झाडे | ११ |
| १७. | गर्भकळी | कु. स्नेहा शेंडे | १२ |
| १८. | मैत्री | कु. मधुरा कुमरे | १२ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराज यांचे अष्टप्रधान मंडळ | कु. निर्झरा येरणे | १३ |
| २०. | बस इतना करो | कु. मेघा तळवेकर | १४ |
| २१. | Multidimensional and Indigenous India | कु. गौरी तेलहांडे | १५ |
| २२. | घरात हसरे तारे असता | प्रा. अजय बिरे | १६ |
| २३. | स्वप्न | कु. अनन्या धोटे | १७ |
| २४. | वाणिज्य विभाग | डॉ. सपना जयस्वाल | १८ |
| २५. | रसायनशास्त्र विभाग | प्रा. ए. एस. भोयर, प्रा. के. के. नांदुरकर | १८ |
| २६. | वनस्पतीशास्त्र विभाग | प्रा. एच. जी. राऊत, प्रा. डी. एस. रेंढे | १९ |
| २७. | प्राणीशास्त्र विभाग | प्रा. प्रणिता आष्टनकर, प्रा. शितल कारामोरे | १९ |
| २८. | भौतीकशास्त्र विभाग | प्रा. स्नेहा सांगोले, प्रा. मेघा लेंडे | २० |
| २९. | गणीत विभाग | प्रा. मोनिका माऊस्कर, प्रा. राकेश लोणकर | २० |
| ३०. | मराठी विभाग | प्रा. अजय बिरे | २१ |
| ३१. | ग्रंथालय विभाग | डॉ. सुनंदा गिरडे | २२ |
| ३२. | राज्यशास्त्र विभाग | प्रा. प्रतिभा दुबे | २३ |

## मनोगत ......

महाविद्यालयीन घडामोडीचा शब्दरूपी वेध घेणारा ''मातोश्री २०२४'' हा वार्षिकांक आपल्या सुपूर्त करतांना मनस्वी आनंद होतोय, आमचे महाविद्यालय महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरशी संलग्नीत आहे. या महाविद्यालयाची सुरूवात ऑगस्ट २०१८ मध्ये झाली. पदवी स्तरावील कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये केवळ २४३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशान सुरू झालेल्या या महाविद्यालयाने ५ वर्षांच्या अल्पशा अवधीत उंच भरारी घेतली आहे. सत्र २०२३–२४ या चालू शैक्षणिक वर्षात ७५६ विद्यार्थी या महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयातील उच्च व गुणवत्ताधारक प्राचार्य व प्राध्यापक वर्ग तिन्ही शाखेतील विद्यार्थ्यांना उत्कृष्टपणे विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

महाविद्यालयबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी याकरीता दूरस्थ शिक्षणाचा पर्याय देखील स्वीकारण्यात आला आहे. चालू शैक्षणिक सत्रापासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केन्द्र महाविद्यालयात सुरू करण्यात आले आहे. ज्याद्वारे बी. ए. व बी. कॉम. साठी दूरस्थ शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे. सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजना, महिला अध्ययन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या आणि अशा अनेक शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने हेच आमचे ध्येय आहे.

क्रीडाक्षेत्र हे व्यक्तिमत्व विकासाचे सर्वोत्तम क्षेत्र आहे, अल्पशा अवधित या क्षेत्रातही महाविद्यायाने आपली छाप सोडली आहे. विविध विद्यापीठस्तरीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत आमच्या विद्यार्थीनींनी प्रतिनिधीत्व केले आहे. क्रीडा हा जीवनविकासाचा एक मार्ग आहे हे लक्षात घेऊन याकडे जातीने लक्ष पुरविल्याचा तो परिणाम आहे, सर्वोत्तम शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याकडे संस्थेचा कल आहे उत्कृष्ट संगणक कक्ष, सर्व सोयींनी युक्त असे कार्यालय, समृद्ध ग्रंथालय, आधुनिक सुसज्ज प्रयोगशाळा, स्वच्छ पेयजल अशा सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त असलेल्या महाविद्यालयाच्या नव्या दिमाखदार वास्तुमध्ये केवळ ६ व्या वर्षी महाविद्यालय स्थानापन्न झाले आहे.

आमचे प्रेरणास्थान आदरणीय श्री. पांडुरंगजी तुळसकर यांचे मार्गदर्शन, सेवेचे व्रत बाळगणारा कर्मचारीवर्ग तसेच पालक व विद्यार्थी यांनी दाखविलेला प्रेम व विश्वास यामुळेच हे सर्व शक्य झाले आहे. महाविद्यालयावर आपला सर्वांचा स्नेह असाच कायम राहील एवढीच अपेक्षा .....

धन्यवाद !

**डॉ. उमेश तुळसकर**

प्राचार्य

# संपादकीय ......

प्रिय विद्यार्थी मित्रांनो ...

विद्याथी हे प्रचंड उर्जेचे स्त्रोत असतात. त्यांच्यातील या उर्जेला विचारांच्या रूपाने प्रकट होण्यासाठी त्यांना व्यासपीठ हवे असते. योग्य व्यासपीठ जर त्यांना मिळाले तर त्यांच्यातील दडलेली अलौकिक प्रतिभा शब्दरूपाने प्रकट झाल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या कल्पनेला पंख फुटून त्यांची प्रतिभा अनेक क्षेत्रात संचार करू लागते. त्यांच्या व्यक्तिमत्वातील सुप्त गुणांना चालना मिळते व त्यांच्याकडून कळत नकळत सुरेख अशा साहित्यकलेची निर्मिती होते. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर वार्षिकांकामधून होत असते हे अंक खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या कला गुणांना नवीन वाट दाखविण्याचे कार्य करीत असतात. 'मातोश्री' हा आमच्या महाविद्यालयाचा वार्षिकांक विद्यार्थ्यांच्या कलागुणांना साकार करण्यासाठीच शब्दबद्ध करण्यात आलेला आहे. सन २०२३–२४ या शैक्षणिक सत्रातील 'मातोश्री' हा वार्षिकांक आपल्या हाती सुपूर्द करतांना मनस्वी आनंद होत आहे.

विद्यार्थ्यांच्या मनातील भावविश्वाला नवीन आकार मिळावा व विचारांचे नवनवीन तरंग शब्दरूपाने उमटावे या विशाल हेतूनेच महाविद्यालय दरवर्षी या वार्षिकांकाची निर्मिती करत असते. या अंकात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लेख, कथा, कविता, ललित इ. साहित्य प्रकार हाताळण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे त्यामुळे विद्यार्थी सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनात एक वेगळी वाट निर्माण करू शकतील ही अपेक्षा.

या वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी नेहमीच आम्हाला प्रेरीत करणारे आमचे मार्गदर्शक आदरणीय श्री. पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष – विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, मा. डॉ. निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, प्रा. डॉ. उमेश तुळसकर, सचिव आणि प्राचार्य, मातोश्री महाविद्यालय, हिंगणघाट यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करणे माझे कर्तव्य आहे.

संपादकीय मंडळातील कार्यतत्पर असणारे प्रा. डॉ. सपना जयस्वाल, प्रा. अभय दांडेकर, प्रा. भाग्यश्री साबळे, प्रा. मोनिका माऊसकर, प्रा. वैशाली तडस यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

संपादक मंडळातील विद्यार्थी प्रतिनिधी, महाविद्यालयीन सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी तसेच टंकलेखन करणारे या सर्वांच्या सहकार्याने हा अंक मी आपणांसमोर अगदी अल्पावधीत साकार करू शकलो. या अंकात अनवधनाने काही त्रुटी राहिल्यास पुढील अंकात त्याबाबत दक्षता घेतली जाईल अशी ग्वाही देतो व माझ्या संपादकीय शब्दांना विराम देतो.

या अंकाचे आपण निश्चितच स्वागत कराल, या अपेक्षेसह .....

धन्यवाद !

**प्रा. अजय नामदेवराव बिरे**
मराठी विभाग

## स्वामी विवेकानंदांचे शैक्षणिक विचार

भारतीय अध्यात्म आणि तत्वज्ञानाची संपूर्ण जगाला ओळख करून देणारा महात्मा म्हणजे स्वामी विवेकानंद होत. आपल्या भाषणातून व लेखनातून स्वामी विवेकानंदांनी मानवधर्माचे सहज, सरळ व रसाळ असे विवेचन केले आहे. सोबतच मानवी जीवन विकासासाठी व राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. मनुष्याच्या ठिकाणी आधीच असलेल्या पूर्णत्वाचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण होय, असे ते म्हणत.

स्वामी विवेकानंदांच्या मते संपूर्ण शिक्षणाचे ध्येय माणूस निर्माण करणे हेच आहे. ज्ञानप्राप्तीच्या काही मूलभूत व महत्त्वपूर्ण विषयाची मीमांसा त्यांनी केलेली आहे. ज्ञानसाधनेची एकमेव रीत म्हणजे एकाग्रता होय. ही एकाग्रताच ज्ञानाची गुरुकिल्ली असल्याचे ते सांगतात. मनाच्या एकाग्रतेसाठी ब्रह्मचर्य पालनाचे महत्त्व देखील त्यांनी प्रतिबिंबित केले आहे. ब्रह्मचर्य पालनानामुळे असामान्य बौद्धिक व आत्मिक शक्तीचा आविष्कार होतो. विचार, उच्चार आणि आचार याबाबतीत सदा सर्वकाळ, सर्व प्रकारच्या अवस्थेत पावित्र्य टिकविणे म्हणजेच ब्रह्मचर्य होय असे उन्नत व प्रगल्भ विचार त्यांनी मांडले आहेत.

श्रद्धा हे माणसाच्या विकासाचे मूळ आहे. हे ओळखून खऱ्या श्रद्धेचा, विश्वासाचा प्रसार हेच आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय त्यांनी मानले. मनुष्याचा विकास हेच शिक्षणाचे ध्येय असते व त्यात श्रद्धा आणि विश्वासाचे स्थान महत्त्वपूर्ण असते . मनुष्याचे शील आणि चारित्र निर्माण हे शिक्षणाचे महत्त्वाचे तत्व होय. मनुष्याच्या प्रवृत्ती आणि संस्कार त्याच्या चारित्र्य निर्माणासाठी आवश्यक असतात. त्याच्या प्रवृत्ती आणि संस्कार त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या सवयी आणि स्वभाव बनतात. शिक्षणाद्वारे मनुष्याच्या व्यक्तिमत्वात अशा सवयी आणि संस्कार निर्माण झाले पाहिजेत. असे स्वामी विवेकानंदांचे आग्रही प्रतिपादन आहे. अशा सर्व प्रवृत्ती आणि संस्कारांमधून मानवी जीवनाचे कल्याण करण्याची इच्छाशक्ती प्रबळ असणे हे शिक्षणाचे सर्वोच्च ध्येय आहे असे मूलगामी विचार त्यांनी मांडले आहेत. 'गुरुगृहवास' ही त्यांची शिक्षणाबद्दलची संकल्पना आहे. शिक्षक चारित्र्यवान असल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे शिक्षण होणे शक्य नाही. शिष्याच्या बाबतीत पावित्र्य ज्ञानोपार्जनाची तृष्णा व चिकाटी हे गुण आवश्यक आहेत. गुरुला शास्त्राचे मर्म अवगत असणे महत्त्वाचे असून पापशून्यता ही दुसरी आवश्यक गोष्ट आहे. पैसा किंवा नावलौकिक यासारख्या स्वार्थी हेतूने शिक्षकाने शिक्षणाचे काम करू नये हेदेखील त्यांनी स्पष्ट केले आहे. शिक्षणात साधन आणि साधना यांचा विचार करत असताना साध्याइतकेच साधनेकडे लक्ष दिले पाहिजे.

एकदा ध्येय ठरवले व त्याची साधने निश्चित केली म्हणजे मग ध्येयाचा विचार सोडून दिला तरी काही हरकत नाही असे ते म्हणतात. स्त्री शिक्षणाचे महत्त्व विशद करताना

स्वामीजी म्हणतात की "स्त्रियांचे जीवन विषादमय असेल, तर कोणत्याही कुटुंबाची व देशाची उन्नती होण्याची आशाच नको.

" स्त्रीजाती बद्दलचे अनेक गंभीर प्रश्न शिक्षणाने सुटू शकतील असा त्यांचा विश्वास आहे. सर्व सामान्य माणसाच्या शिक्षणावरही स्वामीजींनी भर दिला आहे. सर्वसामान्य समाजाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे हे घोर पातक असून अध:पतनाचे ते मूळ कारण आहे अशी स्वामींची धारणा आहे. असे शिक्षणासंबंधीचे जाज्वल्य विचार स्वामी विवेकानंदांनी मांडले आहेत.

**Ku. Shreya Shende**
B. A. I

---

## पेटेन पुन्हा नव्याने

किती पण गरिबी असली, जीवनामध्ये फार त्रास आणि मनस्ताप असला तरी आत्महत्या शेवटचा पर्याय असू शकत नाही. आपली स्वप्ने , इच्छा - आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपले आई-वडील सतत प्रयत्न करीत असतात. त्यांच्या इच्छा, स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे आपले कर्तव्य आहे. कारण ते आपल्यासाठी कष्ट करत असतात हे लक्षात घेतले पाहिजे. जी गोष्ट अत्यंत कठीण वाटते नेमकी तीच गोष्ट करायची असते. गर्दीतले होण्यापेक्षा वर्दीतले होणे केव्हाही चांगले.

काही माणसे विपरीत परिस्थितीत पूर्णपणे तुटून जातात, अगतिक होतात, जीवनात मध्ये नको तो पर्याय स्वीकारतात तर काही माणसे सातत्याने प्रयत्न करीत राहतात जीवनामध्ये यशस्वी होतात.भयंकर , वेदनादायक प्रसंगांनी त्यांचीही पाठराखन केलेली असतेच. कोणत्याही गोष्टीचा शेवट तोपर्यंत होत नाही जोपर्यंत तुम्ही प्रयत्न सोडत नाही. शिखरावर पोहोचायचं असतं, तेव्हा नशिबापेक्षा स्वतःवर जास्त विश्वास ठेवायचा असतो. कठोर परिश्रम आपणाला तिथे नेऊन सोडतील; जिथे आपल्याला कोणीही नशीबवान सापडणार नाही सारे कर्तृत्ववानच सापडतील.

आपल्याला उज्वल भविष्याचा हा उन्नत मार्ग दाखविणारे मात्र असतात ते शिक्षकच. त्यांनीच आपल्या अंतकरणात जाणीव पेरलेली असते, *"भेटेन पुन्हा नव्याने हे सामर्थ्य नाशवंत नाही. छाटले जरी पंख माझे पुन्हा उडेन मी. उडवू शकेल मजला अजून अशी भिंत नाही. माझी झोपडी जाळण्याचे झालेत कैक कावे.जळेल झोपडी अशी आग ती ज्वलंत नाही. येतील वादळे, येतील तुफान तरी वाट चालतो मी. अडथळ्यांना भिऊन अडखळणे पाऊलांना मान्य नाही."

नेहा गजाननराव खोंडे
बी.एस.सी. भाग - १

## आत्मविश्वास .....

ये आसमां छीन गया तो क्या?
नया ढूँढ लेगे,
हम वो परिंदे नही जो
उडना छोड देंगे !!

मत पूछ हौसलें हमारे
आज कितने विक्षब्ध है,
एक नई शुरुआत तथा आरंभ तय है....
माना अभी हम नि:शब्द है!

ये पारावर छूट गया तो क्या?
नया सागर ढूँढ लें,
हम वो कश्तियां नहीं जो
तैरना छोड देंगे !!

कदम चलते रहेंगे....
जब तक श्वास है,
परिस्थिती से परे स्वयं पर हमे विश्वास है,

एक रास्ता मिला नही तो क्या
नई राहे ढूँढ लेंगे,
हम वो मुसाफिर नही जो चलना छोड देंगे !!

ख्वाबों को महकता रखते है,
हम मंजिलो से राबता रखते है
नशा हमें हमारी, फितरत का,
हर हार करती है बुलंद.... इरादा जीत का !

ये मुकाम नही हासिल तो क्या
नये ठिकाणे ढूँढ लेंगे,
हम वो शख्श नही जो अपनी तलाश छोड देंगे !!

**कु. संमृध्दि तांबेकर**
B. Com. II

## आई .......

**तू माऊली जगाची**
**साऱ्या विश्वाची आई**
**तुझ्या थोर पुण्याईने**
**घडे विश्व हे सदाही**
**तुझी तळमळ आई**
**जणू पेटलेला दीप**
**मोती शंखात सापडे**
**आई आसवांची ज्योत**
**कोणी सांगत असेना**
**शब्द हेच पानिपाणी**
**जन्म आईचा  हा थोर**
**हीच भगवंत वाणी**
**आई माहेर तुझे ग**
**सुख-दु:खांचे हे लेणे**
**सोन्यामोत्यात कोरले**
**तुझ्या शब्दांचे देणे**
**माझे जगणे सुखाचे**
**तुझ्या मांडीवर आई**
**मागणे एवढेच माझे**
**नको काशीची पुण्याई**
**मोती माणकांचे शब्द**
**माझी इवलिसी वाणी**
**आई सारखे या जगी**
**नाही पुण्यवान कोणी**

**कु. देवयानी कोडापे**
B. A. I

## शिक्षक ...

कळतच नाही सर मला
काही लिहाव तुमच्या वरती,
कार्यही तुमचे तेवढेच महान
जेवढी आहे किर्ती
तुम्ही नाही केलीत अ, आ. ई
कायद्याच्या जगातली कधी,
पण जीवनाच्या कायद्याची पध्दत
सर तुमची मात्र होती साधी.

तुम्ही आयुष्यभर प्रयत्न केले
आदर्श विद्यार्थी घडावे म्हणून,
थोडा मीही प्रयत्न केला सर
त्यात माझही नाव यावं म्हणून
सर तुम्ही बोललेले शब्द नी शब्द
काव्यासारखे वार करत होते
पण जीवनाच्या रणांगणात
लढण्याचे सामर्थ्यही देत होते
सर तुमच्यातला प्रत्येक गोष्टी
मी माझे आदर्श मानतो,
हरलोच आयुष्याच्या वाटेवर तर
आठवून लढायला बसतो.

सर तुमच्याविषयी खुप लिहायच होतं
माझ्या आयुष्याच्या डायरीत
पण अक्षरच सापडेना सर मला
तुम्ही शिकवलेल्या बाराखडीत
तरी प्रयत्न सोडला नाही मी
सर तुम्ही सांगितलं होतं म्हणून
पण तुमच्या या कवितेतून
माझ आयुष्य गेल झिजून

**कु. अनिका डुकरे**
B. A. II

## बाप .....

आईचं गुणगान खूप झाले,
बिचाऱ्या बापाने काय केले
बिकट प्रसंगी बापच सदा सोडवी
आपण फक्त गातो आईचीच गोडवी
आईकडे असतील अश्रुंचे पाट,
तर बाप म्हणजे संयमाचा घाट
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई
त्या शिदोरीची सोयही बापच पाही
देवकी-यशोदेचं प्रेम मनात साठवा,
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेवही आठवा
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ
काटकसर करुन मुलास देतो पॉकेटमनी
आपण मात्र वापरी शर्ट-पॅन्ट जुनी
मुलीला हवे ब्युटीपार्लर, नवी साडी
घरी बाप आटपतो बिन साबणाची दाढी
वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न
बापाला दिसे मुलांचे शिक्षण, पोरीचे लग्न
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढून लागते धाप
आन मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप
जीवनभर मुलांच्यासाठी बापाच्या सदिच्छा.
त्यांनी समजून घ्यावं हीच माफक इच्छा .....

**कु. आस्था रेवतकर**
B. A. III

## मैत्री ......

मैत्री म्हणजे काय असते ...... ?
एकटेपणातील सहवास म्हणजे मैत्री असते
आनंदाची चाहूल म्हणजे मैत्री असते
दुख:तील दिलासा म्हणजे मैत्री असते
करमणूकीतील विरंगुळा म्हणजे मैत्री असते
संकटातील मदत म्हणजे मैत्री असते
आनंदाचे क्षण म्हणजे मैत्री असते.
कायमची संगत म्हणजे मैत्री असते.
दूर असतो तरी,
आठवण काढणे म्हणजे मैत्री असते.
मित्राची काळजी वाटणे... मैत्री असते.
वाटणारा जिव्हाळा म्हणजे मैत्री असते.
जवळची वाटणारी व्यक्ती म्हणजे मैत्री असते.
जोपासलेली आवड म्हणजे मैत्री असते

मैत्री म्हणजे काय असते....!
मैत्री म्हणजे शेवटी मैत्रीच असते.

कु. रूणाली भगत
B. A. III

## माझी आई ......

आई साठी काय लिहू ....
.... आईसाठी कसे लिहू ....
.... आई साठी पुरतील एवढे ....
.... शब्द नाहीत कोठे ....

.... आई वरती लिहिण्याइतक ....
.... नाही माझे व्यक्तिमत्व मोठे ....
.... आई तू उन्हातली सावली ....
.... आई तू पावसातली छत्री ....
....आई तू थंडीतली शाल ....

.... जीवन हे शेत ....
.... आई म्हणजे विहीर ....
.... जीवन ही नौका तर ....
.... आई .... म्हणजे तीर ....

.... अशी माझी आई ....

कु. माहेश्वरी खोंडे
B. Sc. II

## मनातील दु:ख

दु:ख माझे वेदनेच्या मैफलीत बसले होते
अश्रूंच्या ओलाव्यात बिचारे दुखणे जळले होते
मी करावी किती प्रार्थना जगण्यासाठी मरणाची
जगण्याला जे श्वास हवे ते श्वासच जहरी होते
जुळतात सावल्या सावलीत माझ्या अंधारही अंधारुन जातो
उगाच जगण्याचे हुंदके माझ्यात गहीवरले होते.
असेन मी असेलही काय कुणाला त्याचे
दोष कोणाचे काय सांगू मीच मलाच नकोसे होते

कु. धनश्री सोनवणे
B.Sc. III

# आई-बाबांचे महत्व

आयुष्यात प्रत्येक नाती महत्वाची असतात. पण त्या नात्यातील सर्वात अनमोल नातं हे आई वडिलांच असते. पण आजचे मुल-मुली त्यांचे महत्व विसरत चालले आहेत. आई-बाबा हे फक्त शब्दच नाहियेत. तर आपले आयुष्य आहे. त्यांच्याविना आपलं जीवन शून्य आहे. आई-बाबा हे आपल्या जीवनाच्या गाडीची दोन चाके आहेत. ज्याच्यावर आपल्या जीवनाची गाडी चांगल्याप्रकारे चालत आहे, आई ही ती स्त्री आहे जिने आपल्या जिवाचा विचार न करता आपल्या नऊ महिने आपल्याला गर्भात वाढविले, किती त्रास व वेदना सहन करुन तिने आपल्याला हे सुंदर आयुष्य दिले ? आपल्याला हे सुंदर जग दाखविले ? बाबा म्हणजे आपला आधारस्तंभ आहे. ज्याच्यावर मुलांचा विकास अवलंबून असतो. हे दोन व्यक्ती आपल्या आयुष्यात नसेल तर आपलं आयुष्य उध्वस्त होते. आई-बाबाचे महत्व त्या अनाथ पाखरांना विचारा, ज्यांचे आई-बाबा कधीचेच त्यांना सोडून स्वर्गवासी झाले. त्यांच्या डोक्यावरचा तो मायेचा हात कधीचाच हिसकावून घेतला. त्या चिमुकल्या पाखरांना रहायला घरटे तर आहे पण त्या घरट्यात त्यांचे आई-बाबा नाहीत. त्यांचे अश्रु पुसायला कोणीच नाही, पण हे आजच्या सोशल मिडियाच्या काळातील मुला-मुलींना कसे कळणार ? कारण त्यांना व्हाट्सअॅप वर चॅट करायला वेळ मिळतो पण त्या आई-बाबाशी थोडावेळ बसून बोलायला वेळ नाही. त्यांना त्यांच्या मित्रांसोबत फिरायला वेळ आहे, पण आईने कुठे चल म्हटले की, त्यांना जगभराची कामे सुचतात.

काळ बदलतोय तसं आईबाबांसोबतचे संबंध दुरावत आहेत. आजच्या मुलामुलींचे जग बदलतांना दिसत आहे. तो आदर, ती नम्रता ते प्रेम या सर्व गोष्टीची कमतरता भासायला लागली आहे. जस-जसे ते मोठे व्हायला लागले तस तसे त्यांच आई-बाबांसोबतच बोलणं, बसणं कमी व्हायला लागले आहे. एकेकाळी ज्या आई-बाबांशिवाय त्यांना झोप सुध्दा येत नव्हती, आज त्यांना त्यांची गरजही भासत नाही. त्यांनी जे निर्णय घ्यायचे, ते आपल्या मनानेच घ्यायला सुरुवात केलेली दिसते. त्यांना आपल्या आई-बाबांना सांगायला लाज वाटते, किंवा त्यांना महत्वपूर्ण नाही समजत म्हणून ते आपले निर्णय सांगत नाही. पण तेच निर्णय आपल्या मित्र-मैत्रिनींना सांगायला आवडते का? कारण ते रागावतील, बोलतील, त्यांना त्यातलं काही कळत नाही, अशी आजच्या मुलामुलींची स्थिती होत चालली आहे. यात आपण आपल्या आई-बाबांचे महत्व विसरत चाललोय असं वाटतं. पण आपल्यापेक्षा जास्त उन्हाळे पावसाळे त्यांनी पाहिले आहेत, काय योग्य आहे, काय अयोग्य आहे, हे त्यांना आपल्यापेक्षा जास्त कळते. तरीपण आज आपण त्यांना बोलू देत नाही, ते बोलायला लागले तर आपल्याला त्रास व्हायला लागतो, नेहमी त्यांच बोलणं आपल्याला बळबळजबरीचे वाटत असते. कोणत्याही आई-बाबांना असे वाटत नाही, की आपल्या मुलामुलींचे वाईट व्हावे, म्हणून ते आपल्याला नेहमी कुठेतरी रोक-टोक करत असतात. पण ते रोक-टोक आपल्याला त्रासदायक वाटते. पण आपण त्यांच एकही ऐकत नाही त्यांच ऐकत नसल्यामुळे आपल्या हातातून ते घडते जे कधीच घडू नये. हे सर्व घडल्यानंतर आपल्याला त्यांचे बोलणं त्यांची रोक-टोक आठवत असते, पण तेव्हा खूप वेळ झालेली असते, म्हणून कोणताही निर्णय घेतांना एक वेळा आपल्या आई-बाबांचा विचार करायला शिका. कारण फक्त आपला नि आपलाच विचार करणारी ही दोघचं आहेत, आपले आई आणि बाबा.

**कु. प्रिया उरकुडकर**
B. A. II

# माझं कॉलेज ...

आमचे मातोश्री कॉलेज हिंगणघाट
चला मुलांनो आता जाऊ, यश शिखरांच्या कडे
मातोश्री सुंदर आमुचे,
हिंगणघाटअमुचे गाव
गांधीजीचा जिल्हा आहे
वर्धा त्यांचे नाव
संस्काराच्या, तालावर मोती कसे घडे
मातोश्री देते आम्हा, आदर्शाचे धडे
चला शिकुया, होऊ ज्ञानी
आयुष्य उजळे,
श्रावणातल्या सरीसारखा
रिमझिम पाऊस पडे
दुपारच्या, सुट्टीमध्ये कशी गंमत घडे
मातोश्री देते आम्हा आदर्शाचे धडे
हसता खेळता आम्ही होऊ
संस्काराचे मोती,
हसऱ्या दिव्यांच्या कशा,
जळतात ज्योती,
शिक्षणाने बघा कसे, आयुष्य उजळे
मातोश्री देते आम्हा आदर्शाचे धडे
संस्काराचे  मोती घेवून
आम्ही मोठे होऊ
ज्ञानज्योती लावून जगी,
भरारी ही घेऊ .....

**कु. गौरी तेलहांडे**
B. Com. (Final)

# विचित्र पण सत्य ....

भरलेला खिसा
माणसाला जग दाखवतो
आणि रिकामा खिसा
जगतील माणसं दाखवतो
ज्याला शंभर किलो धानाचं पोतं
उचलता येतं,
त्याला ते विकत घेता येत नाही,
आणि ज्याला विकत घेता येतं
त्याला ते उचलता येत नाही,
विचित्र आहे पण सत्य आहे
आपल्याला जे जे पाहिजे,
ते ते सर्व मिळाले असते तर....
जगायला गंमत आणि
देवाला किंमत राहिली नसती...
चांगले मित्र आणि औषधे
ही आपल्या आयुष्यातील वेदना
दूर करण्याचे काम करतात.
फरक इतकाच की औषधांना
एक्सपायरी डेट असते,
पण मित्रांना नाही.

**कु. कशिश भिसेकर**
B. Sc. I

# शाळा

हे मेघा मला घेऊन जाशील का रे?
माझ्या त्या जून्या शाळेमधी...
ती शाळा ते वर्ग नाहीत रे आता तिथे....
तिथे आहे एक भली मोठी इमारत ...
तिला पाहून मी म्हणते खरे माझी शाळा
पण खरं सांगू का?
मला ती माझी शाळा वाटतच नाही...
माझी शाळा आता हरवली आहे
माझ्याचं स्वप्नांमध्ये आणि प्रत्येकाच्या हृदयामध्ये ...
कोणी आणेल का शोधून तिला ?
माझी शाळा... सर्व काही पुसल गेलं आहे...
सुंदर अशा कॅनव्हासवरती दुसरं चित्र
उमललं आहे, रंगीबेरंगी रंग भरले गेले आहेत...
आणि माझी शाळा
त्याच आवरणाखाली पडली आहे ...
हे मेघा मज घेऊन जाशील का रे?
माझ्या त्या जून्या शाळेमधी ...
हरवली आहे माझी शाळा
याच पृथ्वीच्या गाभाऱ्यामधी..

कु. हर्षदा मोरे
B. A. II

## नशिब .....

जीवन हा एक प्रवास आहे
चालत राहणे कर्तव्य आहे
काय आपणास मिळेल पुढे
हा तर नशिबाचा भाग आहे
कधी आनंद तर कधी दु:ख
हा ऊन सावलीचा खेळ आहे
आंबट, गोड नात्यांची इथे,
एक चविष्ट भेळ आहे.
आयुष्य खुप सुंदर आहे,
जगता येणे महत्वाचे आहे
अडचणी सर्वांनाच आहेत
मात करणं महत्वाचे आहे
आयुष्यात नको होऊ निराश
खरंच इतकं ते कठीण नाही
हे दिवसही बदलून जातील
स्थिर जगात अस काहीच नाही
जीवन हा एक प्रवास आहे
नशिब त्याचा एक भाग आहे ....

कु. केतकी झाडे
B. A. II

# गर्भकळी

कुजबूज कुजबूज गर्भामध्ये
नित तिची चालली होती
सुंदर फूल होण्यासाठी
एक गर्भकळी आसुसलेली होती
गर्भनिवाऱ्यात अनेक स्वप्ने
डोळे मिटूनी पाहत होती
तिच्या भावडांना भेटण्यास
एक गर्भकळी आसुसलेली होती
आईच्या गोड शब्दांना
हुंकार आतून देत होती
स्पर्श आईचा होण्यासाठी
एक गर्भकळी आसुसलेली होती
सुंदर जग मलाही पहायचयं
यासाठी ती धडपडत होती
सुंदर जगी जन्म घेण्यास
एक गर्भकळी आसुसलेली होती
शब्द अचानक कानी पडले
ऐकून आज ती थरथरत होती
मुलगी आहे गर्भात म्हणूनी
आई तिची रडत होती
जिवास धोका जाणूनी आपल्या
गर्भकळी भेदरली होती
काय करावे? कुठे लपावे
जागा सर्वत्र शोधत होती
मार्ग दिसेना कोठे तिजला
हिरमुसून ती बसली होती
स्वप्ने खरी जळून गेली
रूदन आतून करत होती
हात काळाचे येता जवळी
प्रचंड आकांत करत होती
काय चूक रे माझी देवा,
प्रश्न विधात्यास करत होती
श्वास संपला बघता बघता
निपाचित आता ती पडली होती
फुल होऊनी सुगंध देण्याआधी
एक गर्भकळी कोमेजली होती.

**कु. स्नेहा शेंडे**
B. Com. III

---

# मैत्री ....

मैत्री अशी असावी
भरकटलेल्या पाखराला घराची वाट दाखवणारी
सुकलेल्या फुलांना बहर आणणारी,
दुखाच्या वाळवंटात प्रेमाचा पाझर आणणारी
एकटेपणात सहवासाचा दिलासा देणारी
शब्दाविना सर्व काही समजून घेणारी,
न सांगताच डोळ्यातील भाव ओळखणारी .........

**कु. मधुरा कुमरे**
B. A. I

# छत्रपती शिवाजीराजे यांचे अष्टप्रधान मंडळ

छत्रपती शिवाजीराजे म्हणजे महाराष्ट्राचे दैवत व अखील मराठा साम्राज्याचे संस्थापक होत. त्यांनी आपले संपूर्ण जीवनच 'मराठा तेतुका मेळवावा महाराष्ट्रधर्म वाढवावा' यासाठी खर्ची घातले. स्वराज्य स्थापनेपासूनच राज्यकारभारासाठी नवे धोरण त्यांनी आखले. त्यांनी निर्माण केलेले अष्टप्रधान मंडळ त्यांच्या कुशल कर्तृत्वाची साक्ष देते. छत्रपतींनी अष्टप्रधान मंडळ नेमले पण मंत्रीपदे वंशपरंपरागत न ठेवता कर्तबगारीवर ठेवण्यावर भर दिला. त्यांची राज्याभिषेकाची कल्पना अतिशय व्यापक व प्रभावी होती.त्यामुळे निर्विकार पडलेल्या मराठी माणसाला चेतना मिळाली.

*"प्रधान अमात्य, सचिव मंत्री,
सुमंत न्यायाधीश, धर्मशास्त्री
सेनापती त्यात असे सुजाणा
अष्टप्रधानी शिवमुख्य राणा"*

असे त्यांचे अष्टप्रधान मंडळ होते. त्यात शिवरायांनी 'छत्रपती' म्हणजे स्वराज्याचे सार्वभौम सत्ताधारीपद स्वीकारले. न्यायदानाचे अंतिम अधिकार त्यांच्याकडेच होते. राज्यकारभाराची निरनिराळी कामे मात्र त्यांनी आठ मंत्र्यांकडे सोपविली. त्यांची माहिती खालील प्रमाणे ....

१. पंतप्रधान (पेशवा)- मोरोपंत त्र्यंबक पिंगळे मोरोपंत पिंगळे हे प्रथम क्रमांकाचे सर्वोच्च मंत्री होत. शिवरायानंतर स्वराज्यावर त्यांचाच अधिकार होता .सर्व राज्यकारभारावर देखरेख करणे, महाराजांच्या गैरहजेरीत राजाचा प्रतिनिधी म्हणून काम करणे त्यांच्याकडे होते. पगार - वार्षिक १५००० होन.

२. अमात्य (मुजूमदार) - रामचंद्र निलकंठ रामचंद्र नीलकंठ हे महत्त्वाचे मंत्री होत. सर्व महाल, परगण्यांचा जमाखर्च अधिकाऱ्यांकडून लिहून घेऊन तो तपासण्याचे व महाराजांसमोर सादर करण्याचे काम त्यांच्याकडे होते. पगार - वार्षिक १२००० होन.

३. पंत सचिव (सुरजित) - अण्णाजीपंत दत्तो* राज्यात येणाऱ्या, जाणाऱ्या पत्रव्यवहारावर लक्ष ठेवणे, शिवरायांचे आज्ञापत्र (खलिता) जाण्यापूर्वी त्यावर लक्ष ठेवणे, स्वराज्याचे सर्व दप्तर सांभाळणे, जमीन महसूल व्यवहारावर लक्ष ठेवणे इत्यादी कामे त्यांच्याकडे होती. पगार वार्षिक दहा हजार होन.

४. मंत्री (वाकनीस)- दत्ताजीपंत त्रिंबक* महाराजांच्या खाजगी कारभाराकडे लक्ष ठेवणे, महाराजांची रोजनिशी, भोजन व्यवस्था, वैयक्तिक संरक्षण याकडे लक्ष पुरवणे, खाजगी कौटुंबिक आमंत्रणे करणे इत्यादी कामे दत्ताजी पंतांकडे होती. पगार - वार्षिक दहा हजार होन.

५.	सेनापती (सरनौबत) - हंबीरराव मोहिते   हंबीरराव मोहिते हे घोडदळ व पायदळ या सैन्याच्या दोन्ही विभागाचे प्रमुख होते. सर्व सैन्यावर त्यांची हुकुमत चालत असे. पगार - वार्षिक दहा हजार होन.

६.	पंत सुमंत (डबीर) - रामचंद्र त्रिंबक   रामचंद्र त्रिंबक स्वराज्याचे परराष्ट्र मंत्री होते. परराष्ट्रांना खलीते पाठविणे, परराष्ट्रंकडून आलेले खलिते घेणे, परराष्ट्रासंबंधात नियमितपणे महाराजांना माहिती आणि सल्ला देणे, परराष्ट्रातून हेरांच्या साहाय्याने बातम्या काढणे इत्यादी कामे त्यांच्याकडे होती. पगार - वार्षिक दहा हजार होन.

७.	न्यायाधीश (काझी- उल- ऊझत) - निराजीपंत रावजी   निराजीपंत रावजी स्वराज्याचे सरन्यायाधीश होते. त्यांच्याकडे यांचेकडे दिवाणी फौजदारी खटले चालविणे व न्याय देणे हे काम होते.पगार - वार्षिक दहा हजार होन.

८.	पंडितराव दानाध्यक्ष(सद्र - मुहतसिव) - मोरेश्वर पंडित   मोरेश्वर पंडित हे धर्म खात्याचे प्रमुख होते. दानधर्म करणे, पंडित व ब्राह्मणांचा सन्मान करणे, यज्ञ करणे, धर्मकार्याबाबत सल्ला देणे, शास्त्रार्थ पाहणे इत्यादी कामे त्यांच्याकडे होती. पगार - वार्षिक दहा हजार होन.

कु. निर्झरा येरणे
B. Com. II

---

# बस इतना करो....

हदे शहर से नीकली तो गाव गाव चली
कुछ यादे मेरे संग पाव पाव चली.
सफर जो धुप का हुआ तो तजुरबा हुआ,
ओ जिंदगी ही क्या जो छाव छाव चली.

जितुंगा मैं ये खुद से वादा करो,
जितना सोचते हो कोशीश उससे जादा करो
तकदीर भी रूठे पर हिमत ना टुटे
मजबुत इतना इरादा करो

उलझने बढती जाये तो झेलते रहो.
वक्त उतार दे अगर मैदान मे तो खेलते रहो
लोग कहेंगे तुम को पागल बस सुनते रहो
दबाकर लोगो की बाते मन में अपने सपने बुनते रहो

जिस दिन बदल जायेगा तुम्हारा वक्त
सबका विश्वास बदलेगा और जो था कभी
लोगो के लिए पागल अब वो इतिहास बदलेगा

अपने होसलो के दमपर हम अपनी प्रतिभा दिखा देंगे
भलेही कोइ मंच ना दे हमे, हम अपना मंच खुद बना लेंगे

**कु. मेघा तळवेकर**
B. Com. II

## Multidimensional and Indigenous India

According to the given title My personal view, shows the power of our india (Bharat) in Multi leveled or in multidimensional field. From ages to ages, we ensure that our Bharat represents itself self-powered, cultured and self-empowered. 'Bharat' the pure place of scholars called as "Aryavrat' where Aarya lives from many battles on these graceful land to our freedom we every time ensure that our India is powerful from soft power to hard power of our india from ages to until today we feel that our India represent love, peace and power of country in every field. Thus, Among the recent reports and my own analysis I feel that our India is the powerful country and self empowered and indigenous country.

From some best one I remember current News of ourt India's empowerment is in increasing the level of indigenous ones in our country. As by whether it is by collaboration or by indigenously (swadeshi). Recent's AI power MIRV Technology indigenously Made Agni test Missile, Chandrayan-3, G20 hosting in our New Delhi Bharat Mandapam, prabhu Shri Ram Ayodhya Mandir, and last I remember the Hindu (vaishnorlts) Temple in Abu Dhabi (UAE). It defines our power in every field and the fact is that our India gain popularity in automobile largest production with help of Tata infinite progress. The veteran in our India increasiniy spreading their startups and business to employ the overseas and our loved indians.

Also recently we heard about the visit of PM Shri Narendra Modi to Lakshadweep in the Iceland of 'Ninicay to spread the message of Indigenous tourism facilities "Plus destination wedding in our own loved country." To empower the vast tourism sectors in our Country by enhancing cultural sites plus heritage and forts in our county. Hence, to achieve the gaol of first position in the world by achieving trillion economy GDP in world. Rather than this India also target to achieve the het zero carbon and to increase the level of renewable resorcesi in our country, to protect the environment from increase global warming... Last but not least. PM Shri Narendra Modi also divided society into four class poor, youth, former and women. According to him by empowering these four classes we achieve real growth for shashaktikaran and vikasit Bharat' really we all have to work smart and hard.

***Jai Hind, Jai Bharat'***

**Gauri Telhande**
B. Com. (Final)

# घरात हसरे तारे असता

रम्य रत्नाकरची शांतता, चांदण्यांचा दीपोत्सव कुणाच्याही अंतकरणाला साद घालील. कुणी त्यापुढे नतमस्तक होईल, कुणी त्याला नयनात साठवून घेईल. निसर्गाच्या बाहुत सामावलेला माणूस भौतिक सुखाचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करीत राहील. मात्र त्यात त्याला कसे आणि किती यश प्राप्त होईल? आणि जे काही प्राप्त होईल त्यात खरोखरच खरा आनंद, खरे समाधान असेल काय? सिनेतारकांची आतीषबाजी, ऐट, दिमाख राजकारण्यांची सुबत्ता, क्रिकेटपटूंचे आलिशान जीवन, पाश्चात्त्यांचे अनुकरण करणाऱ्यांचे मनमुक्त जीवन...... थोडक्यात सर्व श्रीमंतांचे ऐष आरामदायी जीवन आपण बघतो आणि त्याचा मोह जणू आपणास हरखून टाकतो. आपणास सहजच वाटू लागते किती सुंदर आणि सुखद जीवन आहे त्यांचे? मात्र खरे पाहता इथेच आपण चुकत असतो. दूरवरून विलोभनीय वाटणारा डोंगर जवळ जाऊन पाहिला की कड्या कपारींचा जणू समुच्चयच वाटू लागतो. आपले सोडून पळत्याच्या पाठीमागे धावण्याचा प्रयत्न जो तो करू लागतो. या प्रयत्नात तो कधी तोंडघशी पडतो,कधी सिद्धी प्राप्तीच्या दारावर दस्तकही देतो. मात्र त्यासाठी बऱ्याचदा असत्य, भ्रष्टाचार, अन्यायाच्या मार्गाचा अवलंब करू लागतो. कुणाचे तरी मन मारून, कोणाच्या मनाचा कोंडमारा करून, कोणावर तरी अन्याय अत्याचार करून स्वतः सधन होत जातो. मात्र सारे करून झाल्यावर प्राप्तीच्या उंबरठ्यावर लक्षात येते की हातातील समाधानाचा करंडा रिता अन् रिताच आहे... सुविधा येतात, साधने मिळतात मात्र जवळची सत्यप्रिय, न्यायप्रिय माणसे दूर जातात. आपल्यातून आपणच जणू हरवतो. मग ते हरवले पण शोधण्याचा प्रयत्न आपले अंतर्मन करू लागते पण व्यर्थ.....' होते मृण्मय दिले हिरण्मय हिरण्मय ते शोधीतसे न परी हरपले ते गवसे' अशी आपली स्थिती होते. या अवस्थेत तोंडासमोर तर स्तुती सुमनांचा वर्षाव होत राहतो; पण तोंडामागे...... अशावेळी समोर मोत्याचा चारा पडलेला असतांना त्याला टिपण्याचे सारे सामर्थ्यच जणू आपण हरवून बसलेलो असतो. का असे होते? कारण एकच.... खास स्वतःचे, स्वतःसाठी झटणारे यांना विचारात न घेता जे कधी आपले नव्हतेच त्याच्या पाठीमागे आपण पळत सुटतो म्हणून...... एक गोष्ट आठवते .... अत्यंत गरिबीतून पुढे आलेला व मोठा अधिकारी झालेला 'भिकाजी' नावाचा मनुष्य आई सोबत राहत असतो. आई त्याला नेहमी 'भिक्या...' या शब्दाने साद घालत असते. तो आईला म्हणतो,' तू मला मला भीक्या म्हणत जाऊ नकोस. माझ्याकडे मोठमोठी मंडळी येतात. बरे वाटत नाही.

आईलाही ते पटते. नंतर आई त्याला 'भिकाजीराव' ,'साहेब' अशा शब्दांनी आवाज देऊ लागते. मात्र त्या दिवसापासून भिकाजीराव खूप अस्वस्थ असतात. कारण खऱ्या प्रेमाची 'भिक्या... ही सादच हरवलेली असते.... स्वतःचा मोठेपणा मिरविण्यासाठी साहेबगिरीचा तोरा येतो मात्र त्याच वेळी खऱ्या सुखा समाधानाचा फुलोरा मात्र गळून पडलेला असतो तो असा..... म्हणून घरातल्या, स्वतःच्या आजूबाजूच्या, आपल्याशी निगडित असलेल्या हसऱ्या ताऱ्यांना आपण कायम स्मरणात ठेवायला हवं." माती सांगे कुंभाराला पायीच मज तुडवीशी तुझाच आहे शेवट वेड्या माझ्या पायाशी"हे सूत्रही लक्षात ठेवायला हवे आपल्या असलेल्यांना न तोडता त्यांच्या सहवासात, त्यांच्या सहाय्याने आपण वाटचाल करायला हवी वाटचाल करत असताना दुसऱ्यांनाही आपण साद अवश्य द्यावी, हाताशी घ्यावे. मात्र आपल्या भावविश्वाला, आपल्या सुख विश्वाला, घरातल्या या हसऱ्या ताऱ्यांना आपण कधीही दुरावू नये. यातच खरे सुख यातच खरे समाधान.....

**प्रा. अजय नामदेवराव बिरे**
**मराठी विभाग**

---

# स्वप्न ......

**स्वप्न पहावं मोठ**
**दिसावेही छान,**
**जगण्यात मिळावा आनंद**
**बनावे महान**

**आपण बनाव असं**
**की स्वत: पेक्षा श्रेष्ठ**
**दुसऱ्याने करावे कौतुक**
**एकदम उत्कृष्ठ**

**काय केले म्हणजे**
**सर्वांना प्रिय होता येते**
**दुसऱ्याचं भल होण्यास**
**जन्म झाला समजा येथे**

**आपल्याला सदैव**
**आनंद देणारा दुसरा**
**कोण तो विसरलात?**
**परमेश्वरा शिवाय ना आसरा**

**कु. अनन्या धोटे**
B. Sc. (Final)

## Commerce Department

From the year 2018, undergraduate course B.Com was started for the students through English medium. There are more girls from backward areas taking admission in the college. To Provide Quality Education to Our Student, to Face the Challenge of Modern World, Having Courage and Confidence is Main Object of Our Department. Keeping in mind the need of the times, our department works to make students self-reliant through value added and certificate courses through various programs to create self-employment power among students.

About 375 students study in our faculty. The primary objectives of our faculty are to provide students with up-to-date knowledge of Commerce and develop the students holistically. Various programs are organized for the benefit of the students by establishing a study board under the commerce department. After that, various skill enhancement programs are conducted for their overall development. Training programs are conducted by Nandi Foundation for the overall development of students. PPT presentations on the life of different business men are conducted.

Also, various programs such as poster exhibition, model exhibition are conducted to promote the talents of students. A stress management program was also conducted in the college to reduce stress. The professors of our faculty participate in international national and state level seminars and workshops etc. for their knowledge development and publish research articles and books in the field of research.

Last year Dr. Sapna Jaiswal's book 'Skill Development' was published. Professor Vaishali Tadas and Professor Amit Dixit are pursuing PhD.In this way quality educational and cultural work is always going on for the students through this department. For this department head and vice principal Dr. Sapna Jaiswal, Professor Vaishali Tadas, Professor Amit Dixit, Professor Ganesh Lade, Professor Nikita Chandankhede, Professor Nikita Pimpal Shende, Professor Vaishnavi Ugle etc. are always working.

**Dr. Sapna Jaiswal.**

## DEPARTMENT OF CHEMISTRY

Brief History The department was established in 2018 with B. Sc. Programme, The Department offered UG (B.Sc) courses, in semester pattern. The Department participated and organized many competitions, model, poster presentation, Quiz Competition, Seminar competition in every year on current topic in chemical sciences and also arrange industrial visit to many chemical small and big scale industry for students. In our Department there are 2 faculty members: Prof. Anushri S. Bhoyar (M.Sc. B.Ed.) & Prof. Komal K. Nandurkar(M.Sc. B.Ed).The aim of department is to provide quality education to the youngsters so that they can contribute in the development of the students, exposure to the developing society so the can build their future in a better way. The Department contributed lot for the benefit of the students and always extended hands of cooperation to the needy.

**Ms. A. S. Bhoyar**
**Ms. K. K. Nandurkar**

## The Department of Botany

Was established in 2018. We have two CHB faculties Ms Harshda G Raut and Miss. Darshana S. Rendhe. In our department 25 instruments. Our lab is fulfilled with chemicals, glassware, materials, permanent slides, charts etc. In college library has 403 books of Botany and also form a sectional library of Botany. Sectional library has total 82 different books and journals. These books are handed over to students for regular use. The department has organized field study tour for the all B.Sc. students, for systematic introduction of plants & biodiversity, collection of material, vegetation study and other studies. Student are motivated and benefited by the field visit to improve the knowledge about taxonomy, medicinal plant & flora and fauna of local area. Modern teaching methods practiced and use of ICT in teaching – learning i.e. LCD Projector, Computer, Scanner, Internet facilities, etc available in department.

**Ms. H. G. Raut**
**Ms. D. S. Rendhe**

## The Department of Zoology

The department of zoology was established in 2018 offering undergraduate program in zoology. The department is always abuzz with a plethora of activities from seminars/workshop to enable the annual visits to renowned institutions, laboratories etc. Field study through field based projects in association with other agencies provides them with practical knowledge as well as sensitise the students to the value of existing biodiversity and the need for wildlife conservation.

The department also has a holistic plan when it comes to academics. Each year, the first year undergraduate students are given special training through bridge courses to acquaint with the laboratory instruments techniques and biosafety protocols.The department also offer an value- added course in vermicomposting.Department offers workshop on dated 23rd October on Frontier in biological sciences.An interdisciplinary workshop The objectives of workshop on biological sciences are two inoculate scientific attitude and scientific temper in participants so that they can understand the prevailing situations, perceived the problem and work scientific to resolve them.

Department organised one day online guest lecture on the occasion of world animal day in online mode by doctor Vivek Sahu from department of zoology Andaman and Nicobar Island it provides an opportunity to reflect on the importance of animal in our lives and the need to protect them their habitats and well being making it cruicial date on the calendar for those passionate about the welfare of our fellow creatures.

**Ms. Pranita Ashtankar**
**Ms. Shital Karamore**
(Dept of Zoology)

## Department of Physics

The department of Physics was established in 2018. The department offered UG course B.Sc. in semester pattern. The department of Physics participates and organises various competitions like poster competition, quiz competition, model exhibition.

Every year on different days such as world ozone layer day, world radio day and national science day on related topic belongs to Physics. In our department there are three faculty members with 2 teachers staff Assistant Prof. Sneha Sangole (M.Sc Physics,B.Ed)and assistant prof. Megha Lende (M.Sc Physics,B.Ed) and 1 lab attendant Mr. Shubham Tulaskar (M.Sc).

Our department encourages rural students to come across with concept of gravitation, nuclear Physics, thermodynamic etc. Physics sets out to understand the processes, forces and structure of nature. One of its major characteristic is its ability to describe apparently disconnected complex phenomena in terms of an underlying simplicity of mathematically expressed principles and structures.

Physics department helps to establish a platform for the dissemination and creation of knowledge through teaching and research in physics at various levels. It helps students to encourage logical thinking.

**Ms. Sneha Sangole**
**Ms. Megha Lende**

## Department of Mathematics

The dept of mathematics is established. in 2018. The dept. Comprises the famelly with expertise in various areas of mathematics and Statistics and physics. The faulty member Strive to maintain high standards in teaching and research. The dept. of mathematics organised various activities like National mathematics day, quizes, poster competition, seminars, and guest lectures. Workshops for the overall development of ug students. Dept of mathematics folkes Active learning stategies such as problem-solving persións. group work and interactive discussions to Pengaje students and st enhance understanding.

**Ms. Monika P. Mauskar**
**Mr. Rakesh Lonkar**
(Dept of Mathematics)

# मराठी विभाग

शैक्षणिक सत्र २०२३ – २४ या वर्षात मराठी विभागाच्या वतीने अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विभागाच्या वतीने मराठी अभ्यास मंडळ स्थापनेचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर होते तर प्रमुख वक्ते व उद्घाटक म्हणून विद्या विकास महाविद्यालयातील डॉ. मिलिंद कांबळे उपस्थित होते. सोबतच प्रा.अजय बिरे, प्रा. भाग्यश्री साबळे, प्रा. अभय दांडेकर व उपप्राचार्य डॉ. सपना जयस्वाल तसेच बी.ए., बी.कॉम. व बी.एस.सी. मधील बहुसंख्य विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न झाला याप्रसंगी विद्यार्थिनींची कार्यकारणी गठीत करण्यात आली. या कार्यकारणीला वर्षभरातील विविध कार्यक्रमांचे आयोजन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले गेले. त्यानंतर डॉ.मिलिंद कांबळे यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. मराठीच्या अभ्यासाच्या दिशा व दशा या संबंधात त्यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासन व रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार १५ जानेवारी ते २४ जानेवारी २०२४ पर्यंत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात प्रामुख्याने वाचनाचे महत्त्व लक्षात घेऊन मराठी वाचन कट्टा हा कार्यक्रम घेण्यात आला साहित्यलेखन विषयक जागृती करता दोन दिवसीय आंतर महाविद्यालयीन साहित्यलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यात विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांची साहित्याभिरुची वृद्धिंगत करण्यास सहाय्यक ठरला. यानिमित्ताने ग्रंथ दिंडी देखील काढण्यात आली.

दिनांक २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'मराठी भावगीत स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले त्यात २५ विद्यार्थिनींनी सुंदर सुंदर मराठी भावगीते सादर केली. विद्यार्थ्यांना मराठी व्याकरणाची जाण असावी यासाठी विभागातर्फे मराठी भाषा आणि व्याकरण यावर व्हॅल्यू ॲडेड कोर्स घेण्यात आला. मराठी विभागातील विविध विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच इतर कला व क्रीडा प्रकारातही नैपुण्य मिळवले.

अर्थात संस्थाध्यक्ष आदरणीय पांडुरंगजी तुळसकर, प्राचार्य डॉ.उमेश तुळसकर यांची प्रेरणा व इतर प्राध्यापकांच्या सहकार्याने मराठी विभागाला उज्वल वाटचाल करता आली.

प्रा. अजय बिरे.

प्रा. भाग्यश्री साबळे.

# ग्रंथालय विभाग

मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयाची स्थापना २०१८ ला झाली; तेव्हाच महाविद्यालयात ग्रंथालयाची स्थापना झाली. महाविद्यालयातील ग्रंथालय आधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज आहे. ग्रंथालयात Lib-Auto१० सॉफ्टवेअरची सुविधा उपलब्ध आहे. आमचे ग्रंथालय विद्यार्थी व प्राध्यापकांना आधुनिक सोयी सुविधा देण्याचे कार्य सातत्याने करीत असते. आज संगणकाचे युग असल्याने ई जर्नल सुविधा, ई-बुक सुविधा ग्रंथालयात उपलब्ध आहेत. स्पर्धेचे युग असल्याने स्पर्धा परीक्षेला उपयुक्त वेगवेगळी नियतकालिके, मासिके संदर्भ ग्रंथ यांची व्यवस्था ग्रंथालयाद्वारे केली जाते.सोबतच आंतर ग्रंथालयीन सेवा, पेपर कात्रण सूची, झेरॉक्स सुविधा आदी गोष्टी विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

आमचे महाविद्यालय प्रवासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात असले तरी आज ग्रंथालयात २८९३ पुस्तके व २१७ संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहे. ज्यात अभ्यास क्रमिक साहित्याच्या व्यतिरिक्त कथा ,कादंबरी, कविता, ललित निबंध, प्रवास वर्णन इत्यादी विषयावरील ग्रंथ उपलब्ध आहेत. ग्रंथालयातर्फे दरवर्षी नवनवीन पुस्तकांची खरेदी सातत्याने सुरू असते. १० प्रकारची नियतकालिके मासिके पाक्षिके दर महिन्याला ग्रंथालयात येत असतात. सोबतच स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त अशी नवनवीन प्रकाशित पुस्तके सातत्याने खरेदी केली जातात. त्यामुळे आज महाविद्यालयातील ग्रंथांची संख्या कमी असली; तरी सर्व विषयाशी निगडित पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या मनात ग्रंथ व ग्रंथालय याबद्दल आवड निर्माण व्हावी याकरिता ग्रंथालयाद्वारे उपभोक्ता प्रशिक्षण वर्ग, स्पर्धा परीक्षेशी निगडित उपक्रम, डॉक्टर एस. आर. रंगनाथन जयंती, ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती, वाचन प्रेरणा दिन व नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी लायब्ररी ओरिएंटेशन प्रोग्राम यासारख्या कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते. या कार्यक्रमांद्वारे ग्रंथालयाचे नियमांची ग्रंथालयाच्या महतकार्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिल्या जाते. प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी भव्य ग्रंथ दिंडीचे आयोजनही करण्यात येते.

परिसरातील इतर सार्वजनिक ग्रंथालयांना भेटी देण्यासाठी विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना घेऊन क्षेत्रभेटीचे आयोजन देखील केले जाते. या सर्व कार्यात संस्था, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व इतर कर्मचारी वर्ग या सर्वांचा सहयोग लाभत असतो.

डॉ. सुनंदा गिरडे
ग्रंथपाल

# राज्यशास्त्र विभाग

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून 2018 मध्ये राज्यशास्त्र हा विषय अभ्यासक्रमात आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या नियमांनुसार राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्धाटनानंतर विद्यार्थिनींची कार्यकारिणी तयार करून विभागामार्फत विविध कार्यक्रम वर्षभर घेण्यात येतात. राज्यशास्त्राच्या मंडळाद्वारे विविध प्रकारचे प्रोग्राम, गट चर्चा, परिसंवाद, 'संविधान दिन' इ. कार्यक्रम साजरा केले जातात. सोबतच विभागाद्वारे क्षेत्रभेटीचेही आयोजन करण्यात येते. मतदार जागरूकता या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व प्रतिपादन करून दिल्या जाते. विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी घटक चाचणी, सेमिनार, गटचर्चा. यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन देखील विभागामार्फत केले जाते. विभागाद्वारे 'संविधान दिवस' साजरा केला जातो. सोबतच विभागाद्वारे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन केले जाते. एकूणच विद्यार्थ्यांच्या व्यापक विकासाचा दृष्टिकोन ठेवून विभाग कार्य करीत असतो.

प्रा. प्रतिभा दुबे
राज्यशास्त्र विभाग.

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे छायाचित्रे



















# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे छायाचित्रे





















विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

# मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट

## VISION

The Vision of the Institution is to make significant progress in future towards being a model career-oriented college and to provide affordable education. To create a center of academic excellence in the field of higher education for Students.

## MISSION

To achieve all round development of the students, we aim at encouraging creativity, employment, social service along with the need of environment, sports and cultural proficiency to stand in globalized world.

## पदवी शिक्षण विभाग

कला शाखा (Arts B. A.)

वाणिज्य शाखा (Commerce B.Com.) (माध्यम इंग्रजी)

विज्ञान शाखा (B. Sc.) CBZ/PCM

